जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २१.१०.२०२५**

## '' पोलीस स्मृतीदिन ''

लडाखमधील भारताच्या सिमेवर बर्फाच्छादित अशा 'हॉटस्प्रींग' या ठिकाणी २१ ऑक्टोबर १९५९ साली १० पोलीस जवान गस्त घालीत असताना दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांनी त्यांच्यावर भ्याड हल्ला केला. या हल्याला पोलीस जवानांनी जशास तसे उत्तर दिले आणि शेवटच्या क्षणापर्यत झुंज दिली. सदर हल्यात १० पोलीस जवान शहीद झाले होते. या घटनेमुळे संपुर्ण देश हादरला होता. भारतीय जवानांच्या अतुलनीय शौर्यापासुन इतरांना स्मृती मिळावी, कर्तव्याची आणि राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणुन हा दिन ''पोलीस स्मृतीदिन'' म्हणुन पाळला जातो.

त्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयातर्फे मंगळवार दिनांक.२१.१०.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजता स्वर्गीय निर्मलादेवी चिंतामण दिघे उद्यान, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण कार्यालयाजवळ, ठाणे येथे ''पोलीस हुतात्मा दिन'' साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात देशभरातील १९१ शहीदांना मानवंदना देण्यात आली.

सदर ''पोलीस हुतात्मा दिन'' कार्यक्रमाकरिता मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तसेच मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे, डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, सह पोलीस आयुक्त, ठाणे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी/अंमलदार, स्वातंत्र सेनानी, सामाजिक कार्य करणाऱ्या प्रतिष्ठीत व्यक्ती, जेष्ठ नागरीक, वृत्तपत्र प्रतिनिधी तसेच शहिद जवानांचे नातेवाईक मोठया संख्येने उपस्थित होते.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर